पुण्यनगरी दिनांक :- 09/02/2021

# पंजाबचा दहशतवादी नांदेडात गजाआड

नांदेड / आनंद कुलकर्णी : पंजाब येथील अमृतसरमध्ये बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेच्या एका सदस्याला रविवारी नांदेड येथून अटक करण्यात आली. पंजाब पोलीस आणि नांदेड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. गुरपिंदरसिंघ संतासिंघ असे त्याचे नाव आहे. अटकेनंतर न्यायालयात हजर करून प्रवासी रिमांडवर त्याला पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## स्थागुशाची कारवाई

पंजाब पोलिसांनी खलिस्तान जिंदाबाद संघटनेशी संबंधित चार जणांविरुद्ध बंदी आदेश जारी केला होता. त्यापैकी एकजण नांदेड येथे असल्याची गुप्त माहिती पंजाब राज्य पोलीस दलाला मिळाली होती. त्या अनुषंगाने पंजाब पोलीस नांदेड येथे आले होते. पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे आणि स्थागुशाच्या पथकाने पंजाब पोलिसांच्या ▸▸ पान ९ वर

## पंजाबचा दहशतवादी नांदेडात ...

मदतीने नांदेड तहसील कार्यालयांच्या परिसरात आरोपीला ७ फेब्रुवारी रोजी दुपारी २.०५ वाजता ताब्यात घेतले. त्यानंतर प्रवासी रिमांडवर त्यास पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या चौघांविरुद्ध पंजाब येथे १८/२०२० प्रमाणे कलम १३, १७, १८,१८-बी, २० यु.ए.(पी) आर/डब्ल्यू २५/५४/५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुरपिंदरसिंघ संतासिंघ (वय ३७, रा.गुरुसर, जि.मुक्तसरसाहिब, पंजाब) असे अटक कण्यात आलेल्या दहशतवाद्याचे नाव आहे. यावेळी कारवाईत स्थागुशा व पंजाब पोलीस सी.आय. पथक (काऊंटर इन्स्टीलीजिएनट) वरिष्ठ पोलीस निरीक्षकासह अधिकारी व त्यांचे कर्मचारी सामील होते. आरोपीच्या शोधासाठी नांदेड येथे आल्यानंतर पंजाब येथील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नांदेडचे पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर पंजाब पोलिसांच्या या पथकाने कायदेशीर कागदपत्रे पोलीस अधीक्षकांसमोर सादर करून त्यांना सविस्तर माहिती दिली. यानंतर पोलीस अधीक्षकांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्यावर या आरोपीस पकडण्याची जबाबदारी सोपविली. स्थागुशाचे सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती व पंजाब पोलीसच्या टीमकडून नांदेडमध्ये दोन दिवस गोपनीय ऑपरेशन चालवले. यानंतर स्थागुशाचे सहायक उपपोलीस निरीक्षक जसविंदरसिंघ शाहू, पोलीस हेड कॉन्स्टेबल मारोती तेलंग, पोलीस नायक रूपेश दासरवार, पोलीस कॉन्स्टेबल मारोती राम पवार, तानाजी येळगे, राजबन्शी यांच्या पथकाने सदरील आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले.